# लैंगिक अत्याचार ही तुमची चूक नाही ...

## घाबरुन गप्प बसू नका... मदत घ्या !

- ‘ती’ ७ वर्षांची चुणचुणीत व बडबडी मुलगी. ‘तो’ गावाहून नोकरीच्या शोधात आलेला तिच्या घरात पोटभाडेकरु म्हणून राहणारा दूरचा मामा. घरात कुणीही नसताना त्याने खेळाच्या नावाखाली तिच्याबरोबर बरेच वेळा लैंगिक चाळे केले व तिला सांगितले “मी जे करतोय ते कुणाला सांगितलेस तर तुझी आई मरेल. तुला शपथ आहे तिची.” आईला या विषयी शंका आल्याने तिने मुलीला विश्वासात घेऊन बोलते केले. सारे सांगितल्यावर ती आईला म्हणाली, “मामा म्हणाला, मी हे सांगितले तर तू मरशील... मी सांगितल्यावर तू मरणार नाही ना ?”
- घर ते ऑफिस व ऑफिस ते घर असा साधा दिनक्रम होता ‘ती’ चा. ऑफिसमध्ये तिची तब्येत बिघडली. ती डॉक्टरकडे जाण्यासाठी टाळाटाळ करत होती. मैत्रिणीने खूप खोदून विचारल्यावर तिने सांगितले ऑफिसमधून घरी परतताना त्यांच्या वस्तीतील एका इसमाने काही निमित्ताने घरात बोलावून तिच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी शारिरीक संबंध केला. या अनपेक्षित घटनेने ती इतकी घाबरली की प्रतिकारही करु शकली नाही. याबद्दल कुठे काही सांगितले तर तिचीच बदनामी करण्याची धमकी त्या इसमाने दिली होती....
- संध्याकाळ झाली होती. मुलं घरी वाट पाहत असतील या काळजीत ‘ती’ बसची वाट पाहत होती. साहेब गाडीतून आले व म्हणाले, “मी सोडतो घरी”. त्यांनी दिलेलं थंड पेय प्यायल्यावर तिला गुंगी आली. पहाटे जाग आली तेव्हा ती गाडीत अर्धनग्न अवस्थेत होती. साहेबांच्या हातात बंदूक होती. याबद्दल कुठे वाच्यता केली तर तिला जीवे मारण्याची धमकी देऊन त्यांनी तिला सोडून दिले.

असं का घडलं... ?

### लैंगिक अत्याचाराबद्दल न बोलण्याची कारणे




### लैंगिक अत्याचाराचे पिडीत व्यक्तीवर होणारे परिणाम

लैंगिक अत्याचारामुळे होणारी घुसमट सहन करु नका. लैंगिक अत्याचार ही तुमची चूक नाही हे लक्षात ठेवा. हा अत्याचार करणाऱ्या व्यक्तीने सत्तेचा केलेला गैरवापर आहे. त्यामुळे तुम्हाला समाज काय म्हणेल असा विचार करण्याचे काहीच कारण नाही. हिंसेचे अनेक परिणाम असतात. त्याचे निराकरण करणे आता आपल्या हातात आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी म्हापसा गोवा येथील (आझिलो)/नोर्थ गोवा डिस्ट्रिक रुग्णालय येथे स्त्री अत्याचार निवारण केंद्र कार्यरत आहे.

### स्त्री अत्याचार निवारण विभाग यांच्याकडून मिळणारी नि:शुल्क मदत :

**हॉस्पिटल :**
- पूर्णपणे मोफत उपचार
- वैद्यकिय चाचणी



**पोलिस :**
- पिडीत व्यक्तीच्या हक्कांची माहिती
- पोलिस व्यवस्थेशी संबंधित प्राथमिक प्रक्रियेची माहिती
- पोलिसात तक्रार करायची असल्यास मदत



**न्याय व्यवस्था :**
- पिडीत व्यक्तीच्या हक्कांची माहिती
- न्याय व्यवस्थेशी कोर्ट संबंधित प्राथमिक प्रक्रियेची माहिती
- मोफत कायदेशीर सल्ला



**स्त्री अत्याचार निवारण केंद्र :**
- सुरक्षितता पडताळणी व नियोजन
- मदतीकरता आलेल्या व्यक्तींबद्दल गुप्तता पाळली जाते.
- लैंगिक अत्याचारानंतर कोणत्याही क्षणी मदत मिळण्याची तरतूद
- समुपदेश/ काऊंन्सिलिंग
- तात्पुरता निवारा उपलब्ध करुन देण्यात मदत
- पुनर्वसनाकरिता मदत
- विनामुल्य मदत

### थोडक्यात पण महत्त्वाचे :

फौजदारी प्रक्रिया संहिता ३५७ क अन्वये (फौजदारी कायदा दुरुस्ती २०१३) लैंगिक हिंसेला बळी पडलेल्या व्यक्तीला जवळच्या खासगी अथवा शासकिय रुग्णालयात तातडीने व मोफत प्राथमिक उपचार मिळणे हा त्या व्यक्तीचा अधिकार आहे. तिला अशी मदत नाकारणे हा गुन्हा आहे.

**मदत घ्या... अन्याय सहन करु नका... !**

## स्त्री अत्याचार निवारण केंद्र

(आझिलो)/नोर्थ गोवा डिस्ट्रिक हॉस्पिटल, ओ.पी.डी. क्र.३३, फार्मसी जवळ, म्हापसा गोवा-४०३५०७.
वेळ : सोम. ते शुक्र. स. ९:०० ते सायं. ४:३०, शनि. स. ९:०० ते दुपारी १२:३०
फोन : ०८३२ २२५४४४४ (अपघात विभाग) / ०८३२ २२६२२११